GOVERNMENT OF KARNATAKA

KARNATAKA SCHOOL EXAMINATION AND ASSESSMENT BOARD

P.U.C.II YEAR EXAM - 1, MARCH 2025

Time : 03:00 HRS　　Sub : Marathi(07)　　Marks : 80

Scheme of Valuation

---

I. अ.

| | | |
|---|---|---|
| 1. | C रयतेला | 1 |
| 2. | B शाहू महाराज. | 1 |
| 3. | A ग्यानबा तुकाराम. | 1 |
| 4. | C संत ज्ञानेश्वर. | 1 |
| 5. | A बापाची | 1 |
| 6. | A भवानी आई. | 1 |
| 7. | B वनराणीला. | 1 |
| 8. | A सखीला. | 1 |
| 9. | B दिल्लीची. | 1 |
| 10. | C दूध | 1 |

ब.

| | | |
|---|---|---|
| 11. | पंचमी विभक्ती. | 1 |
| 12. | प्रतिज्ञा करणे. | 1 |
| 13. | टिकाव लागणे. | 1 |
| 14. | आस्तिक. | 1 |
| 15. | तीनच. | 1 |

क

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **16.** | i. | D | संत सोयराबाई. | 1 |
| | ii. | E | संत सेना न्हावी. | 1 |
| | iii. | F | संत बसवेश्वर. | 1 |
| | iv. | B | गोविंदाग्रंज. | 1 |
| | v. | A | शाहीर अमरशेख. | 1 |

II. अ.

**17. राणी चन्नमाचे बालपण व विवाह :** 5

राणी चन्नमाचा जन्म बेळगांव जवळील काकती या गावी झाला. चन्नमाच्या वडिलांचे नांव धुळाप्पागौंडा व आईचे नांव पद्मावती होते. कन्नड भाषेत चन्ना म्हणजे सुंदर होय. जन्मताच मूलगी सुंदर होती म्हणून चन्नमा नाव ठेवण्यात आले. चन्नमाला कन्नड, मराठी, उर्दू भाषा घरीच शिकण्याची व्यवस्था वडिलांनी केली होती. तसेच घोड्यावर बसणे, भाला फेकणे, तलवार, जांबिया, चालविणे व धनुष्य बाण चालवणे इत्यादी हत्यारे चालविण्याचा शिक्षण दिले.

कित्तुरचे राजे व टिपू सुलतान यांच्यात वारंवार लढाई होत असे तेंव्हा कित्तूरचे राजे मलसर्ज यांनी सरदार व फौज संघटित करुन काकतिच्या जंगलात सरावासाठी राहूट्या उभारल्या होत्या. त्या भागातील गावकरी राजा मल्लसर्ज जवळ येवून धुमाकुळ घालणा-या वाघाची शिकार करण्याची विनंती करतात. मग राजा मल्लसर्ज जंगलात जावून वाघावर नेम धरुन बाण चालवितात त्यानंतर राजा वाघाजवळ जातात तर वाघाला दोन बाण लागलेले असतात. दुसरे बाण चालविणा-या घाडशी सुंदर, तडफदार चन्नमा व राजा मल्लसर्ज यांची भेट होते. त्यानंतर मल्लसर्ज राजेनी धुळाप्पा गौडा यांच्याकडे चन्नमाशी लग्नाची मागणी करतात. मग मोठ्या जल्लोषात लग्न सोहळा पार पडतो.

**18. सईने बाळागंवड्याचा समाचार कसा घेतला :** 5

रामा भिंगरेच्या निधनानंतर सईवर दु :खाचा डोंगर कोसळतो. घर, लहान मुलगा याची सर्व जबाबदारी सईवर येते मग सई चार-पाच घरची कामे करायला लागते. कामधंदा आटोपून येण्या जाण्याच्या वाटेवर बाळा गंवडी बांधकाम करत होता. रंगेल व चावट स्वभावाचा बाळा गंवडी बायकांना 'ए काकी', ए नानी असे हाका मारुन चिडवत असे, सई रस्त्यातून जाताना बघून 'कुटल पाखरु हाय र' असे म्हणतो तेंव्हा सई रागावून बाळा गंवड्याला म्हणते की, 'तूला आई-बहिण कोण नाही का ? तसेच तुझ्या बायकोची कोणतरी छेड काढली तर तूला चालेल काय ? माझा पती मरुन गेल्यात पण त्याचे जोडे जपून ठेवले आहे. जर पुन्हा छेड काढली तर त्या जोड्याने तुझे थोबाड फोडेन असे बोलून सईने बाळा गंवडीचा समाचार घेतला.

**19. पालकांच्या मुलांच्या बाबतीत अवास्तव अपेक्षा :** 5

आजचा काळ स्पर्धेचा पैसा हे आपले सार्वभौम दैवत होय. आपला मुलगा डॉक्टर, वकिल, इंजिनिअर झालाच पाहिजे, मोठा अधिकारी झालाच पाहिजे अशी अपेक्षा करतो. पण मुलांची आवड, मुलांची कुवत, बुध्दीमत्ता, इकडे दुर्लक्ष करतो. आपल्या जीवनातील अपूर्ण इच्छा मुलांनी पूर्ण कराव्यात अशी पालकांची इच्छा असते. इतर यशस्वी मुलांची बरोबरी आपल्या मुलांन करावी म्हणून पालक मुलावर आपले विचार लादत असतात. पालकांच्या अपेक्षा, अपूरी स्वप्न, कुवत नसलेली मूल अपयशी ठरली तर संपूर्ण आयुष्य खुरटलेली, आकसलेली, मनात स्वत :बद्दल हीनगंड बाळगूण वावरणारी आणि परिणामी आई-वडिलापासून दुरावलेली आढळतात. मुलांना त्यांच्या आवडीनुसार त्याचे भविष्य निवडू द्यावे मगच मूल पालकाकडे एक आदर्श पालक म्हणून पाहतील. मगच मूले आयुष्यात प्रगती करतील.

## ब

**20. संदर्भ :** **3**

पाठाचे नांव : शिक्षण हाच आमचा तरणोपाय.

पाठाचे लेखक : डॉ. जयसिंगराव पवार.

स्पष्टीकरण : शिक्षण हेच मानवी जिवनातील यशाची शक्ती होय. तसेच शुद्र व स्त्रीयांचा विकास शिक्षणाणेच शक्य आहे हे शाहू महाराजानी ओळखले मानवाचा सर्वांगीण विकास शिक्षणाणेच शक्य होते म्हणून शाहू महाराजानी प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तिचा कायदा केला.

**21. संदर्भ :** **3**

पाठाचे नांव : माझ आयुष्य.

पाठाचे लेखक : डॉ. बाबासाहेब आंबेडकर

स्पष्टीकरण : बाबासाहेब आंबेडकर लहाणपणी साता-यात वडिला बरोबर काही दिवस राहायला होते. त्यांच्या घरासमोर एक उकिरडा व उंबराचे झाड होते. लेखक क्षणात झाडावर चढायचे तेथे कांबळ टाकून झोपायचे मनात आल्यावर झाडातून उकिरड्यातील राखेत उडी मारायचे त्यावेळी साता-याला प्लेगची साथ आली होती. लोक म्हणत की गावातील अनेक लोक प्लेगने मेले या पोरालाच प्लेग का होत नाही.

**22. संदर्भ :** **3**

पाठाचे नांव : प्रदूषणावर उपाय नाही का ?

पाठाचे लेखक : शशिकांत मांडके.

स्पष्टीकरण : प्रदूषणावर अनेक उपाय आहेत पण अंमलात येत नाहीत. जगात अनेक शस्त्रास्त्रांचे, विमानाचे, वाहनाचे,अनेक प्रकारचे काराखाने निघत असतात. त्या कारखान्यांचा विस्तार फार प्रचंड असतो. जगात जशी मोठी लोकसंख्या वाढत आहे त्या प्रमाणे शहरे वाढत आहेत प्रचंड मोठे रस्ते, फारमोठी शेत जमीन व्यापतात अशी लेखकांनी आपले मत मांडले आहे.

**23. संदर्भ :** **3**

पाठाचे नांव : जीवनाची सायंकाळ.

पाठाचे लेखक : वि. वा. शिरवाडकर

स्पष्टीकरण : आप्पासाहेब व कावेरी आपली मुलगी नलूच्या घरी राहायला येतात नलूच्या घरी पतीचे पैशाचे पाकीट चोरीला जाते. मग नलू सर्व नोकरांची झडती घेते शेवटी नलू आप्पासाहेबांच्या खोलीत येऊन पैशाच्या पाकीटाचे शोध घेते नलू आप्पासाहेबांच्यावर चोरीचा आळ घेते तेंव्हा आप्पासाहेबांना फार राग येतो. आपली सारी नातीगोती, संबंध तोडले गेले असे म्हणतात. सगळी दुनिया आपल्यासाठी संपली आहे. आपण नवरा बायको दोघच उरले आहोत असा कावेरी आप्पासाहेबांना धीर देताना वरील वाक्य म्हटले आहे.

## क

**24. आई व मुलगा यांच्यात गोसावीनी केलेला समेट : 4**

गोविंद प्रभुंची रीधपुरी गावातील विहीरीजवळ आई व मुलगा यांची भेट होते. तेंव्हा म्हातारी आई गोसावींना वंदन करुन आपला मुलगा वारंवार भांडतो. व रुसुन घर सोडून जात असतो. त्याला आपण त्याची जबाबदारी व त्याला चार हिताची बाबी पटवून सांगा असे विनंती करते. तेंव्हा गोसावींनी आई व मुलगा यांना बोलावून त्यांच्या समस्या जाणून घेवून दोघामधील मतभेद दूर करतात. दोघांनाही आपापल्या जबाबदारीचे जाणीव करुन देतात. दोघानांही कौटुंबिक सुखाचा मार्ग सांगतात दोघानांही गोसावींचे आदर्श विचार पटतात व त्यानंतर आई व मुलगा दोघेही गोविंद प्रभूचे आभार मानून आपल्या घरी निघून जातात.

**25. शिवाजी महाराजांची रयते विषयीची असलेली काळजी : 4**

दलवटणे येथे छावणीचे आयोजन केले होते. छावणीस पूरेसे अन्नधान्य, चारा व जीवनावशक वस्तूंचा पुरवठा केला जातो. मग शिवाजी राजानी सरदारांना, सैनिकांना योग्य नियोजन करण्याच्या सूचना दिल्या आहेत. मनमानी केल्यास साठा संपल्यावर घोडे, हत्ती, मरु लागतील. मग सैनिक धान्य, चारा यासाठी रयतेवर जबरदस्ती करु लागतील. रयत लोक कष्टात जगत असतात त्यांना त्रास दिल्यास ते राज्य सोडून जावू लागतील. उपाशी प्राण्यांचा, दु :खी रयतांचा पाप आपल्याला लागेल. रयत लोकांशी संपर्क साधून योग्य मोबदला देवून त्यांच्याकडून धान्य, चारा विकत घ्यावे. रयतेला त्रास देवू नये गरज पडल्यास बाजारातून विकत घ्यावे अशी शिवाजी महाराजांची रयते विषयी मनात काळजी होती.

**26. संत तुकारामांचे देवाकडे पाहण्याचा दृष्टीकोन : 4**

संत तुकाराम सांगतात की, मानवाने सदैव देवांच्या जवळ असावे. देवाला शरण जावे देवाला आवडेल की नाही याचा विचार करुन सदैव वागावे. देवाची पुजा म्हणजे नुसती फुले वहाणे नव्हे आपण मानवानी वेदांचा अर्थ समजून वागावे. आपण मानवांनी विश्वभरांची पूजा करताना सर्वा विषयी मनात आदर असावा. कोणाचाही व्देष मत्सर करु नये. कारण देव तर सर्वामध्ये असतो. म्हणून संतानी सर्वेश्वराची पूजा म्हणजेच चराचरातील सर्वांवर प्रेम करणारे विचार मनात असावे. मानवानी चांगल्या मार्गान पैसा कमवावा जनतेला उपाशी ठेवून जनतेच्या भावना दु :खवून पैसा मिळवू नये. समोरची जनता म्हणजेच देव होय. जे दु :खात, कष्टात आहेत, त्यांना जो मदतीस जातो तोच खरा साधूसंत होय तिथेच देव आहे असे मानावे.

**27. देवाकडे काही मागू नये : आजीचे मत : 4**

आपण लहानपणी आईकडे घरातील मोठ्यांच्याकडे काही मागत असतो. पण तेच मोठे झाल्यावर कोणाकडेही तसेच देवाकडेही काहीही मागू नये कारण आपणाला जगात जगण्यासाठी आवश्यक असलेले डोळे, कान, बुध्दी, हात-पाय, तोंड सर्व काही देवाकडे आपण घेवूनच आलो आहोत. मग या सर्व गोष्टी कशासाठी आहेत चावायला वाघाच तोंड दे, वाहायला हत्तीच बळ दे, निसटायला चिरटाच अंग दे अस म्हणत बसलो तर कसे चालणार. तसेच सर्वांना सगळ हव असेल तर एकटा देव कुटून देणार त्या देवानेच आपल्याला जन्म दिलेला आहे. तर त्याने सारे देवूनच इथ पाठविल आहे. माणसासारखे हजारो प्राणी, पक्षी आहेत त्यापैकी एका प्राण्याने, पक्षाने कोणाजवळ काहीतरी मागताना नाही पाहिले. समर्थ पणे प्राणी पक्षी जगत असतात. बुध्दीमान माणूस मात्र देवाकडे इतराकडे सदैव मागताना पाहून प्राणी पक्षी पेक्षा मानव कमी आहोत असे वाटते.

## III - अ

**28.** **4**

नलराजा बागेत फिरताना एक राजंहस दिसतो मग राजा त्या हंसपक्षाला पकडतो तेंव्हा हंसपक्षी नलराजाला विनंती करतो कि माझी सुटका करावी कारण माझी गृहस्थिती फार वाईट आहे. माझ्या म्हाता-या आईला उडता येत नाही तसेच माझ्या पत्नीने नुकताच सात आठ पिल्लांना जन्म दिला आहे. त्या सर्वाची पोठ भरण्याची जबाबदारी माझ्यावरच आहे. माझी सुटका केली नाही तर म्हातारी आई पत्नी व लहान पिल्ले उपाशी मरतील त्याचे सर्व पाप आपल्याला लागेल म्हणून कृपा करुन माझी सुटका करावी अशी हंसपक्षी नलराजाकडे विनंती करतो. तेंव्हा नलराजाला पक्षाची दया येते मग नलराजा हंसपक्षाची सुटका करतो. तेंव्हा हंसपक्षाला आनंद होतो. व हंसपक्षी म्हणतो की, हे नलराजा या जगात तुझ्या सारखा दयावान कोणी नाही असे म्हणून नल राजाचे हंसपक्षी आभार मानतो.

**29.** **4**

**कवी फ.मु. शिंदे आईचे अस्तित्व, आईचे महत्व :**

आई हे नांव असत घरातल्या घरात गजबजलेले गाव असते. आई घरात सर्व करते आई घरात असते तेंव्हा आपणाला तिची किंमत कळत नाही. तिच महत्व अस्तित्व समजत नाही तेंव्हा तिची जाणीव आपणाला नसते. आई जाताना तिच्या आठवणी मनात ठेवून जाते. आपल्या मनाला जिवाला, कळाव असे सर्व काही देवून जाते. आई एक धागा असते. वातीला उजेड दावणारी समईतील जागा असते. ती अंधारात विझली की, कितीही शोधले तरी आई मिळत नाही. गाय-वासरु प्रमाणे आई मुलाचे नात असते. आई म्हणजे दुधाची साय, लंगड्याचा पाय असते, आई धरतीप्रमाणे माया करते. आई म्हणजे प्रत्येकांची जन्माची शिदोरी असते.

**30.** **4**

**जीव माझा गुतलाय :** आईला वाकळ शिवताना आपली मुलगी बाळीची आठवण आली आहे. बाळी लहान असताना आईचे लक्ष कायम बाळीकडेच असायचे. बाळी लहानपणी सुंदर गोड दिसायची. लहानपणी आपली मुलगी बाळीचे घरात चालणे, पळणे म्हणजेच तिच्या सगळ्याच पाऊल खुणानी घर सजलेले होते. बाळी मोठी झाल्यावर विहिरीला पाणी आणण्यासाठी जायची तसेच कपडे धुण्यास ओढ्याच्या काठी जात असे पण येता-जाता तिची नजर आपल्या पायाकडेच असायची अशा आपल्या गुणी मुलीची वर्णन शिवारातील तसेच पिंपळकट्यावर बसलेली माणस सारख कौतुक करायचे, त्यानंतर दुरुन एक गुणवान मुलगा येतो व आपल्या मुलीशी म्हणजेच बाळीशी लग्न करुन घेवून जातो. सासर फार सुंदर आहे. बाळी व आपला जावई यांची जोडी फार चांगली आहे. आपल्या बाळीचा सुखाचा संसार पाहून आईला आपल जीवन सार्थक झाल्याचे वाटते. आईचा जीव बाळीत गुतलाय हेच खर वाटते.

ब

**31.** **3**

**संदर्भ :**

कवितेचे नांव : पसायदान.

कवी : संत ज्ञानेश्वर,

स्पष्टीकरण : संत ज्ञानेश्वर विश्वात्मक परमेश्वराकडे विनंती करतात की माझ्या वाग्‌यज्ञाला आपण संतुष्ट व्हावे. व प्रसन्न होऊन मला पसायदान द्यावे. विश्वातील प्रत्येक मानवाच्या मनातील दुष्टपणा नाहिसा व्हावा. प्रत्येकाना चांगले कार्य करण्याची प्रेरणा मिळावी. दु :खी कष्टी लोकांच्या जीवनातील अंधार दु :ख नाहिसे व्हावे. प्रत्येकांना आवडीने मनासारखे जगू द्यावे. मग सर्वांना सर्व सुख मिळतील.

**32.** **3**

**संदर्भ :**

कवितेचे नांव : सुंदर हिरवे माळ.

कवी : गिरीश.

स्पष्टीकरण : पाऊसाच्या आगमनानंतर प्राणी-पक्षी मानव, माळराण, शांत झाले आहे. पावसानंतर पाणी चारा मिळाल्याने पशु पक्षी मनाने तृप्त झाले आहे. पण शेतकरी मात्र अशांतच राहिला आहे. पावसानंतरही भरपूर कष्ट केले तरी सुख लाभेल, सुखाचे दिवस येतील याची शक्यता नसते, शेतक-याला बारामहिने शेतात राबले तरी त्याच्या पोटामधला जाळ निवला जात नाही. शेतक-याच्या मनाला व पोटाला शांतता केंव्हा लाभेल असे कवीला वाटते.

**33.** **3**

**संदर्भ :**

कवितेचे नांव : सखी,

कवयित्रीचे नांव : हिरा बनसोडे

स्पष्टीकरण : कवयित्रीच्या घरी एक सवर्ण मैत्रीण येते तेव्हा कवयित्रीला फार आनंद होतो. त्यानंतर कवयित्री प्रेमाने जेवणाचे ताट लावते, त्यांनतर मैत्रीण जेवणास बसते. सखीला जेवणाच्या शेवटी मागच्या भातावर ताक किंवा दही लागते. तेंव्हा सखी कवयित्रीला दही, ताक वाढण्यास सांगते, तेंव्हा कवयित्रीच्या घरात दही-ताक नसते.तेंव्हा सखी कवयित्रीला तुमची जात कधीच सुधारणार नाही असे म्हणते, तेंव्हा कवयित्रीला फार दु :ख होते. मग कवयित्रीला आपल बालपण आठवते, बालपणी दही-ताक नव्हे तर घरात चहाला दुध ही नसायचे याची कवयित्रीला आठवण होते.

# क

## 34. कुडल संगम देवास प्रसन्न करण्याची रीत : 3

संत बसवेश्वर सांगतात कि मानवाने कधीही चोरी करु नये. निष्पाप प्राण्याची हत्या करु नये, सर्व प्राणीमात्रावर प्रेम करावे, खोटे बोलू नये, कायम सत्य बोलावे. दुस-यांचा तिरस्कार करुन नये दुस-यांचा व्देष करु नये. अहंकारात जगू नये, गर्व करु नये. आपण समानतेने वागावे मनात वाईट विचार आणू नये. आपले चांगले वर्तन हीच ख-या अर्थाने अंतरंग - बहिरंग शुध्दी होय. कुडलसंगमदेवास प्रसन्न करण्याची हीच खरी सोपी रीत होय.

## 35. संत सोयराबाईनी संसारिकांना केलेले मार्गदर्शन : 3

संत सोयराबाई संसारिकांना मार्गदर्शन करत आहे की, मानव हा संसारातच खरे सुख मानत आहे. खरोखर संसार म्हणजे मृगजळ असते. प्रत्येकजण सुखात असल्याचा भास होतो. एका क्षणात ऊन दुस-या क्षणी सावली असते. त्याप्रमाणे संसारात सुख दु :खाचा खेळ चाललेला असतो. मानव विनाकारण माझी शक्ती, सौंदर्य, बुध्दी, वैभव यात गुंतवून घेतो. तसेच मी माझे, स्त्री, पुत्र, धन यात गुरुफटून घेतो. मानवी संसाराचे योग्य स्वरुप समजून घेवून वाईट विचारांचा वेळीच त्याग करावा नाहीतर मानवाची जन्मोजन्मी फजिती होईल असे सोयराबाई म्हणतात.

## 36. एकलव्याच्या तुटलेल्या बोटातील रक्ताचे मोल : 3

विसाव्या शतकाच्या शेवटच्या टोकावर कवितेतील नायक उभा आहे. समाजाला अज्ञानातून, अंधारातून प्रकाशाकडे नेण्यासाठी एका हातात सूर्य घेवून प्रकाशाची वाट दाखवत आहे व एका हातात चंद्र घेवून समाजात प्रेमाची एकतेची भावना निर्माण करणारा मोठा संकल्प हाती घेतला आहे. गुरु द्रोणाचार्यानी एकलव्याचा अंगटा घेवून जाती व्यवस्था व वर्ण व्यवस्थेतून अन्यायाने काढून घेतला. त्यांच्या अंगट्यातून सांडलेले रक्त ते माझे इमान आहे.त्याच्याशी मी प्रामाणिक राहीन असे कवी सांगतात.

## 37. निष्टा :- बापाची शिकवण : 3

कवी प्रदीप पाटील यांनी शेतकरी बापाची शेतीवरील निष्टा स्पष्ट केली आहे. वारक-याचा पंढरपुरला जाण्याचा नेम चुकेल पण बापाची शेताला जाण्याचा नेम कधी चुकणार नाही. गाव पहाटेच स्वप्नात असते तेव्हा माझा बाप रानात असतो. उगवत ते माझ आणि सापडत ते दुस-याच असे वडिलांचे आदर्श विचार असतात. कष्टाच जे येत ते माझ व बिनकष्टाच किंवा मोफत जे मिळत ते दुस-याच अशी बापाची नीती असते. जगण कितीही अवघड झाले तरी शेतक-याचे शेतावरील निष्टा कमी होवू नये अशी बापाची योग्य शिकवण असते.

## IV

**38.** **पाझर : गावातील पोरांनी बाबलला का मारले** **5**

बाबल जवळील गावात जावून बनपाव विकण्याचा व्यवसाय करत होता. सगळ्यांना दादा, काका, असे संबोधून आदर देत असतो. बाबलचा ही सर्वजण मान, आदर करतात. एक दिवस संसदेवर हल्ला होतो त्या हल्ल्याचा टि.व्ही. वर बातमी वारंवार दाखविले जाते. त्यामुळे गावातील मुलांच्या मनात मुस्लीम विरोधी भावना बळावत जाते. दुस-या दिवशी बाबल बनपाव विकायला जाताना काही मुलाकडून विनाकारण मारहाण केली जाते. मग बाबल भिवून गोदा पाटलांच्या घरात जावून दडून बसतो. गावात या घटनेची चर्चा सुरु होते. मग गोदा पाटलांनी गावातील पंचाना व सर्व गावक-यांना चावडी जवळ बोलावले व बाबलला मारणा-या पोरांना विचारतात कि बाबलची काय चुक झाली म्हणून तुम्ही त्याला मारले ? पण त्या मुलाकडे त्याचे योग्य उत्तर नसते. मग गोदा पाटलांनी सर्व गावक-यांना बाबल व जैतुनबीच्या घराण्याचा इतिहास व महत्व पटवून सांगतात. मग मारणा-या पोरांना जैतुनबीच पाय धरायला लावून माफी मागायला लावतात. अशा त-हेने गोदा पाटलांनी बाबला न्याय मिळून दिला.

**39.** **5**

लेखक तात्यांना भेटण्यासाठी त्यांच्या घराकडे जातात तात्यांच मोडकळीस आलेल घर बघुन तात्यांच्या जीवनाची झालेली होरपळ लक्षात येते. घरात जुनी मोडकी भांडी,फाटके कपडे, शिल्लक आहेत तात्यांनी आपले संपूर्ण आयूष्य समाजाच्या विकासासाठी खर्च केले. आपला, संसार आपल घर दार, आपल्या आशा आकांक्षा याचा विचार न करता दूस-याचे संसार सुखाचे व्हावेत म्हणून अंखड प्रयत्न केले. समाजाच्या विकासासाठी सत्याग्रह केले. तुरुंगवास भोगला, समाजाची शिक्षणा शिवाय प्रगती नाही हे ओळखून मुलामुलींना शाळेत जावून प्रवेश घेण्यास मदत करायचे. 'शिका संघटीत व्हा, गुलामगिरी करु नका', असा संदेश द्यायचे. प्रत्येक मुलामुलींच्या लग्नात तात्या भाग. घेत व लग्न यशस्वी करत. पण आज तात्यांच्या मुलीचे लग्न, पैसा अभावी अनेक वर्षे झाले तरी लग्न होत नाही आहे.

**40.** **5**

पंडितला लागलेल्या वाईट सवयी व त्याचा परिणाम :- पंडित हा विलास काका व अंजनाबाईचा लाडाने वाढलेला पण पुर्ण पणे बिघडलेला मुलगा आहे. पंडित शिक्षण घेईल म्हणून कॉलेजला पाठवल पण नापास होवून गावात येतो व उनाड, वाईट मुलांची मैत्री करतो. त्यानंतर पंडित हळूहळू गुटखा खावू लागतो. धाब्यावर जावून दारु पिवून चिकण मटण खावू लागतो. पुढे जावून मटकाही खेळू लागतो. डेरीतून दूधाची बील घेवून खर्च करु लागतो. शेत आपल्या नावावर करुन घेवून थोड शेत ही विकतो. कारण व्याजाचे पैसे भरायचे होते म्हणून.

त्यानंतर गावातील घरंदाज पोरीची छेड ही काढतो व ते लोक भांडण करण्यास व पंडितला मारण्यास आल्यावर विलास काकांनी माफी मागून कसतरी ते प्रकरण मिटवतात. पंडित पुर्णपणे वाया गेला होता. त्याला आई अंजनादेवीचा पांठिबा होता. शेवटी डांन्स बारला गेले असताना पोलिसांची रेड पडते पंडितला तुरुंगात पाठवले जाते. अशा पंडितच्या वाईट व्यसनामुळे विलासकाकांना अर्धांग वायुचा झटका पडतो व त्याचा संपूर्ण कुटुंबाला गळफास लागतो व सर्व कौटुंबिक जिवन उध्वस्त होते.

**V**

**41. तकार अर्ज 5**

**समस्त गावकरी**

**मु.पो. राजापूर**

**ता. चिक्कोडी, जि. बेळगांव.**

**प्रति,**

**अध्यक्ष**

**ग्राम पंचायत कार्यालय,**

**राजापूर, चिक्कोडी.**

**विषय :- रोग प्रतिकारक औषध फवारणी करण्याबाबत.**

**महोदय,**

आपल्या गावात नुकतेच महापूर येवून गेला आहे. त्यामुळे दुषित पाणी, दुषित हवा यामुळे अनेक रोग पसरत आहेत. तसेच डासांचे प्रमाण वाढल्याने अनेक गावकरी आजारी पडत आहे. त्यावर उपाय म्हणून ग्रामपंचायती मार्फत रोगप्रतिबंधक औषध फवारणी करणे आवश्यक आहे. गावक-यांच्या आरोग्याचा विचार करुन लवकर औषध फवारणी करण्यासबंधी तक्रार अर्ज लिहीत आहे. या अर्जाचा लवकरात लवकर विचार करुन औषध फवारणी करावी अशी नम्र विनंती.

**अर्जदार :- गावकरी मंडळी.**

**अबकड**

**यरलव**

**VI**

**42.** **निबंध :**

निबंधाची आकर्षक सुरुवात असावी. विषयानुरुप आकर्षक मांडणी करावी, वाक्यप्रचार व म्हणींचा योग्य वापर करावा, मुद्देसुद मांडणी व आकर्षक शेवट करावा.

**वयोवृध्द लोकांचे दु :ख :** **5**

आई-वडिल आपल्या मुला-मुलींचे लहानपणापासून फार काळजी करतात. मुलांच्या आरोग्यासाठी, शिक्षणासाठी, सर्वांगीण विकासासाठी आहो रात्र कष्ट करत असतात. मुले मात्र जीवनात यशस्वी झाल्यावर आपल्या म्हाता-या आई- वडिलाकडे दुर्लक्ष करतात. आई-वडिल म्हातारपणी शरीराने, मनाने, कमकुवत झालेले असतात. त्यावेळी मुले आपल्या संसारात रमतात पण आई-वडिल अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य यासाठी मदत मिळत नाही म्हणून रडत असतात. त्यांना घरात नको म्हणून काही मुले वृध्दाश्रमात, अनाथासारखे दु :खात जगायला सोडतात. मग वयोवृध्द आई-वडिल आश्रमात दु :खात जगत असतात. तेथे खाण्यास काही मिळत नाही, चांगले रहायला मिळत नाही, औषधेही मिळत नाहीत. आरोग्याकडे दुर्लक्ष होते. पण यापेक्षाही आपली मायेची मुल, नाती दूर गेली याचेच जास्त दु :ख वयोवृध्द लोकांना असते.

**किंवा**

**आरोग्य हीच खरी संपत्ती :** **5**

आधुनिक जगात सर्वकाही मिळते पण निरोगी शरीर, चांगले आरोग्य सहजासहजी मिळत नाही. ते प्रयत्नाने मिळवावे लागते. सकस आहार, भरपूर मेहनत, योग्य शारीरीक हालचाल करावे लागते. वेळेवर जेवण, वयानुसार शांत झोप घेणे आवश्यक असते. आधुनिक काळात धान्य, भाजीपाला, फळफळावर, शरीरास मारक असलेल्या औषधांचा फवारा केला जातो. त्याचाही आरोग्यावर परिणाम होत असतो. आधुनिक काळात सर्व लोक पैशाच्या मागे लागलेला आहे. सर्व आयुष्य पैसा कमावण्यात जातो व आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष होतो आणि सोन्यासारखे आरोग्य बिघडते मग सर्व कमावलेला पैसा खर्च होवून जातो. म्हणून घर, पैसा, संपत्ती, वैभव, जीवन सर्व काही महत्वाचे आहे पण त्या पेक्षा आपले आरोग्य हेच खरी संपत्ती आहे. असे प्रत्येकानी ओळखले पाहीजे.